# मृत्यूचा वास

**गुरुनाथ नाईक**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B268

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**मृत्यूचा वास : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

मृत्यूचा वास / ५
शवपेटीची चोरी / ७९

# मृत्यूचा वास

# १

कॅप्टन महंमद शबीर अत्यंत महत्त्वाचे कागदपत्र घेऊन डेहराडूनहून दिल्लीकडे येण्यासाठी निघाला होता. पण का कोण जाणे त्याच्या मनात भीतीने ठाणे मांडलेले होते. कोणाची तरी आपल्यावर सतत नजर असावी असेच राहून राहून त्याला वाटत होते.

आपल्याला असे का वाटावे हे तो सांगू शकत नव्हता. आपल्याला ठार करण्यात येईल... आपल्याला जिवंत ठेवले जाणार नाही ही भीती मनात वाटत असली तरी तो आपल्या अधिकाऱ्याला हे सांगू शकत नव्हता किंवा पोलिसांची मदत मिळवू शकत नव्हता.

कारण, कॅप्टन शबीर हा अत्यंत धाडसी अधिकारी म्हणून ओळखला जात होता. अशा अधिकाऱ्याने केवळ संशय आला म्हणून घाबरावे आणि मदत मागावी हे त्याला शोभण्यासारखे नव्हते.

दिल्लीला तो गाडीतून उतरला तेव्हा त्याच्या हातात केवळ एक सुटकेस होती. आपल्यासाठी हॉटेलात खोली राखून ठेवण्यात आलेली आहे हे त्याला माहीत होते. हॉटेल अशोक या अलिशान हॉटेलमध्ये तीन-चार दिवस राहण्याची संधी त्याला मिळालेली होती.

त्याने टॅक्सी केली. हॉटेलवर जाऊन आरामात दिवस घालवावेत हा विचार त्याने केला. मनातील भीती त्याने घालवून टाकली. एका गजबजलेल्या अलिशान हॉटेलमध्ये आपल्याला गाठण्याचा कुणी प्रयत्न करील हे त्याला पटण्यासारखे नव्हते. पुन्हा तो पूर्वीसारखाच निर्ढावलेला बनला.

तो हॉटेलमध्ये आला. त्याच्यासाठी राखून ठेवलेली खोली मिळाली. जेव्हा त्याने खोलीत प्रवेश केला तेव्हा कोपऱ्यातील फोन वाजत असल्याचे त्याच्या लक्षात आले. घाईघाईत त्याने रिसिव्हर उचलला.

'हॅलो शबीर, तू त्याठिकाणी राहणं धोक्याचं आहे.' पलीकडून आलेल्या अनोळखी आवाजाने तो दचकला.

'तू कोण?' शबीरने स्वतःला सावरून खणखणीत आवाजात विचारले.

'हे बघ शबीर, फोनवर माझं नाव सांगणे योग्य नाही. तू तसाच बाहेर ये. समोरच्याच फुटपाथवर निळी पँट आणि पांढरा बुशशर्ट घातलेला एक तरुण भेटेल, त्याच्याबरोबर ये.'

'पण मला तशा सूचना मिळालेल्या नाहीत.' कॅप्टन शबीरने वाक्य झटक्यात उच्चारले पण त्याआधीच पलीकडचा रिसीव्हर ठेवून दिलेला आहे हे त्याच्या लक्षात आले. गोंधळलेल्या मनःस्थितीत त्याने रिसीव्हर खाली ठेवला.

हॉटेल सोडून जाण्याचे धैर्य त्याच्यात नव्हते. शत्रूच्या हाती आपण सापडलो तर आपल्याला जिवंत ठेवले जाणार नाही याची कल्पना त्याला आलेली होती. आलेला फोन हा अनेपक्षित होता. कार्यक्रमात बसणारा नव्हता. आपण जाणे योग्य नाही असेच मन त्याला बजावत होते.

पण मनाची घालमेल मात्र थांबत नव्हती.

दार उघडून तो खोलीच्या दारात आला. पांढऱ्या वेशातील त्या माळ्यावरचा नोकर आपल्याच दाराकडे रोखून पाहत होता असं त्याला वाटले. आपल्या शत्रूने आपली माणसे या हॉटेलात तर पेरलेली नसतील ना अशी एक शंका त्याच्या मनाला चाटून गेली. तो नोकर लिफ्टच्या बाजूने जिना चढून निघून गेला. तरीही कॅप्टन शबीरच्या मनातील गोंधळ थांबला नाही.

त्याने पुन्हा दार बंद करून घेतले. पण मनाची बेचैनी काही थांबली नाही. कपडे उतरवून तो बाथरूममध्ये शिरला. गार पाण्याने स्नान करून त्याने कपडे बदलले. ओला टॉवेल वाळत टाकणार तोच दारावरची बेल वाजली. विचारांच्या धुंदीत असलेला शबीर दचकला.

प्रथम त्याची नजर टेलिफोनवर स्थिर झाली. जेव्हा दुसऱ्यांदा बेल वाजली तेव्हा तो दाराजवळ आला. त्यावेळी नकळत त्यांच्या हृदयाचे ठोके वाढलेले होते.



'कोण आहे?'

'मी... ज्याला तू भेटायला आलास तो.'

पण कॅप्टन शबीरच्या मनाचे समाधान झाले नाही. आपल्याला भेटायला येणारा माणूस कोणत्या पद्धतीचा आणि दिसायला कसा असेल हे चित्र त्याच्या डेहराडूनहून निघण्यापूर्वीच डोळ्यांपुढे उभे करण्यात आले होते.

'एक मिनिट... मी कपडे बदलतो.' कॅप्टन शबीरने स्वतःला सावरले आणि खणखणीत आवाजात सांगितले.

धोका आहे याची खात्री पटली तर तो खून करून हवी ती मदत मागवू शकत होता; पण शक्यतो गोंधळ टाळायचा आणि शक्य तितक्या अज्ञातवासात राहायचे अशाच सूचना त्याला देण्यात आलेल्या होत्या आणि त्या सूचना पाळणे महत्त्वाचे आहे असे त्याला वाटत होते.

त्याने सुटकेसमध्ये तळाला असलेला एक लखोटा काढला. तोच लखोटा अत्यंत महत्त्वाचा होता. त्याच लखोट्यासाठी आपला खून पडेल याची जाणीव त्याला होती. त्याने आजूबाजूला नजर फिरवली. तो लखोटा कुठे दडवावा हे त्याला समजले नाही.

शांतपणे त्याने रिसिव्हर उचलला. दाराबाहेरच्या माणसाला ऐकू जाणार नाही याची काळजी घेत त्याने ऑपरेटरला एक नंबर सांगितला. एका मिनिटात त्याला कनेक्शन मिळाले.

'हॅलो, कॅप्टन शबीर बोलतो.' त्याने आपली ओळख करून दिली. आपण उच्चारलेले कोड भाषेतील शब्द पलीकडच्या माणसाला समजलेले आहेत याची त्याने दोन वेळा खात्री करून घेतली. फारसा आवाज होणार नाही याची काळजी घेत त्याने रिसिव्हर खाली ठेवला.

हातातील लखोटा घेऊन तो बाथरूममध्ये आला. संडासाची टाकी जवळजवळ सात फुटांवर आहे हे त्याने पाहिले. भिंत आणि ती टाकी यांच्यामध्यला पोकळीत तो लखोटा उडवून दिला.

घाईघाईत येऊन त्याने दार उघडले. दाराबाहेर कुणीतरी उभे असेल अशीच त्याची कल्पना होती पण त्याला कुणीही दिसले नाही. मघाचाच नोकर घाईघाईत डाव्या बाजूच्या जिन्याकडे जात असलेला त्याने पाहिला. पण पूर्वीसारखी भीती त्याला वाटली नाही.

त्याचवेळी समोरचे किंचित उघडे असलेले दार सताड उघडले गेले. भपकेबाज पेहरावातील एक व्यक्ती त्या दारातून बाहेर आली. त्याच्या मागून आलेल्या तरुणीने दार ओढून बंद केले. आणि हातातील चावी पर्समध्ये टाकली.

एकाएकी तिची नजर कॅप्टन शबीरवर स्थिर झाली. मंदपणे हसून तिने मान डोलावली. ती आपल्याला ओळखत असावी असे शबीरला वाटले, पण तिला कुठे पाहिलेले आहे हे मात्र त्याला आटवत नव्हते.

'आपण कॅप्टन शबीर?' जवळ येत तिने विचारले.

'हो... आपण कोण?' शबीरची नजर भपकेबाज पेहरावातील तरुणालादेखील न्याहाळीत होती.

'मी सलिमा जोसेफ. आपली ओळख जम्मूला झाली होती. कॅप्टन पांडेनी करून दिली होती.'

तरीही कॅप्टन शबीर गोंधळला. स्वतःच्या स्मरणशक्तीवर त्याचा पूर्णपणे विश्वास होता. या तरुणीची व आपली कधी काळी ओळख झालेली आहे हे तर त्याला अजिबात आठवत नव्हते.

'तू तुझं काम करून ये.... मी कॅप्टन बरोबर थांबते.' खूश होऊन सलिमा बोलली. आपण अद्याप आपल्या जोडीदाराची ओळख करून दिलेली नाही हे तिच्या लक्षात आले.

'हा राज कौशल. अमृतसर येथे याचा कारखाना आहे आणि लवकरच आम्ही लग्न करणार आहोत.' तिने दोघांचीही एकमेकांशी ओळख करून दिली.

'पण सलिमा, तू याना त्रास का देतेस? जर का यांनाही बाहेर जायचं असेल तर?'

'तुझ्याबरोबर कोण येणार? तू जाशील तिथं धंद्याच्या गोष्टी बोलणार. तुझी मिटिंग चालेल दोन तास. त्या दोन तासात मी हैराण होऊन जाईन. कॅप्टन, मी संध्याकाळी सातपर्यंत तुम्हाला कंपनी देऊ शकते?'

'जरूर... यांची हरकत नसली तर?' कॅप्टन शबीर मनातल्या मनात खूश झाला. नाहीतरी एकाकी असे त्याला वाटतच होते. आपल्याला काहीतरी धोका आहे या जाणिवेने तो गडबडून गेलेला होता. निदान संध्याकाळी सात वाजेपर्यंत तरी आपल्याला सोबत मिळते हेच समाधान त्याच्या चेहऱ्यावर दिसत होते.



'माझी काहीच हरकत नाही. कॅप्टन मी ठीक सात वाजता येईन... नंतर आपण डायनिंग हॉलमध्ये जाऊ. त्यावेळी मात्र तुम्ही मला कंपनी द्यायला हवी.' राज कौशल हसून बोलला आणि सलीमाचा खांदा थोपटून झपाझप पावले टाकत लिफ्ट जवळ आला. बटन दाबून त्याने लिफ्ट वर बोलावली. तो जाईपर्यंत सलिमा दाराबाहेरच उभी होती आणि कॅप्टन शबीरसुद्धा.

सलिमा आत येताच कॅप्टनने दार बंद करून घेतले. आता का कोण जाणे पण त्याच्या मनातील गोंधळ पूर्णपणे नाहीसा झालेला होता. कुणीतरी आपल्या सोबतीला आहे, या जाणिवेने तो खूश झाला होता.

सलिमाला आरामखुर्चीत बसायला सांगून तो खिडकीजवळ दुसरी खुर्ची ओढणार तोच फट् असा आवाज झाला. आपल्या डोक्यात काहीतरी शिरल्याची जाणीव त्याला झाली. पण नंतर मात्र पाहता पाहता तो उभ्या उभ्याच खाली कोसळला. पर्समधून काढलेले सायलेन्सर असलेले रिव्हॉल्व्हर सलिमाने पुन्हा पर्समध्ये टाकले. वळवळणाऱ्या कॅप्टन शबीरकडे लक्षही न देता तिने सुटकेस उघडली. त्यावेळी तिच्या हातात शरीराच्या रंगाशी मिसळून जाणारे मोजे होते. अगदी जवळून पहिल्याशिवाय तिच्या हातात मोजे आहेत हे कळणे शक्य नव्हते.

तिने घाईघाईत संपूर्ण सुटकेस उलटी करून आतले सामान खाली टाकून दिले. आपल्याला हवे ते त्यात नाही हे तिने ओळखले. तिने सुटकेसची आतून बोटांनी दाबून खात्री करून घेतली. तोपर्यंत कॅप्टन शबीरची हालचाल पूर्णपणे थांबलेली होती.

तिने कॅप्टनचे कपडे तपासले, पण तिला हवे ते सापडले नाही. नुकताच आलेला कॅप्टन शबीर भलामोठा लखोटा त्या जागेत कुठेही दडवून ठेवणे शक्य नव्हते. तरीही तिने कॉटवरच्या गादीखालीसुद्धा नजर टाकली. पंधरा मिनिटात ती निराश बनली. आपण एकतर उशीर केलेला आहे किंवा घाई केलेली आहे हा विचार तिच्या मनात आला.

खिन्न होऊन ती कॅप्टन शबीरच्या प्रेताकडे पाहत असताना बेलचा आवाज झाला. आपला जोडीदार आला हे तिने ओळखले. घड्याळात पाहात तिने दार उघडले.

आणि बाहेर पाहताच सरसरीत काटा तिच्या अंगावार उभा राहिला. अर्धवट उघडलेले दार बाहेरून धक्का बसताच ताड्कन तिच्या डाव्या खांद्यावर आदळले. ती कळवळली.

आणि त्याचवेळी बाहेरून आलेल्या तगड्या जवानाने तिचे उजवे मनगट पकडले. मागून आलेल्या दुसऱ्या तरुणाने दार बंद करून आतून कडी लावली. त्यावेळी सलिमा भीतीने थरथरत होती. तिच्या अंगावर सरसरीत काटा उभा राहिलेला होता. आपल्याला मुद्देमालासहित पकडण्यात आलेले आहे आणि कोणत्याही परिस्थितीत आपल्याला जिवंत ठेवणार नाहीत याची खात्री तिला झालेली होती.

'बोल, तुझा जोडीदार कुठं आहे?' मनगट पकडलेल्या तरुणाने भेदक पण थंड आवाजात विचारले.

पण सलिमा उत्तर देऊ शकली नाही. दुसरा तरुण घाईघाईत बाथरूममध्ये शिरलेला तिने पाहिला. जवळजवळ दोन मिनिटांनी तो बाहेर आला. तेव्हा एक लांबट मोठा लखोटा त्याच्या हातात होता. आणि याच लखोट्यासाठी तिने कॅप्टन शबीरला ठार केलेले होते.

'दीप, हे सामान सुटकेसमध्ये ठेवू?' हातात लखोटा घेतलेल्या तरुणाने विचारले. तो होता लेफ्टनंट शेख आणि सलिमाचे मनगट पकडून उभा असलेला होता कॅप्टन दीप.

सलिमाने पाहताक्षणीच कॅप्टन दीपला ओळखले असावे. त्याला पाहिल्यामुळेच तर तिच्या हातापायातील सारी ताकद नष्ट झालेली होती. आणि तिने स्वतःची आशाच सोडून दिलेली होती. कॅप्टन दीप जळजळीत नजरेने तिच्याकडे पाहत होता.

'सलिमा, कॅप्टन शबीरला मृत्यूचा वास लागलेला असावा... पण तो कुठून येईल हे त्याला ओळखता आलं नसावं. तुला हवा तो लखोटा तुझ्यासमोर आहे.' चिडलेल्या कॅप्टन दीपने स्वतःच्या मनावर जबरदस्त ताबा ठेवलेला होता.

सलिमाचे हातपाय बांधण्यात आले. तिच्या तोंडात बोळा कोंबून वरून पट्टी आवळण्यात आली. पंधरा मिनिटांनी दोन भल्या मोठ्या सुटकेसीस घेऊन सहा फौजी माणसे आली. एका सुटकेसमध्ये सलिमाला कोंबण्यात आले. तर दुसऱ्या सुटकेसमध्ये शबिरला ..... खाली पडलेले रक्ताचे डाग ओल्या फडक्याने पुसून काढलेले होते.

दोन्ही सुटकेसीस घेऊन सारेजण निघून गेले. जाणाऱ्या येणाऱ्यांची गर्दी असल्यामुळे त्यांना कुणीही विचारले नाही.

✦✦✦



## २

डॉक्टर पिटर डिसुझा एकाएकी पेकिंगमधून गायब झाला आणि चीनचे हेर खाते हादरले.

डॉक्टर डिसुझा हा गाजलेला सर्जन. फोटो काढायचे त्याला अतिशय वेड. दुसरे वेड म्हणजे शिकारीचे. चीनमध्ये त्याला बऱ्याच सवलती मिळालेल्या होत्या. पण त्याच्यावर हळूहळू चिनी हेर खात्याची नजर फिरू लागली कारण, तो भारतासाठी हेरगिरी करीत असावा असा संशय त्याच्या बाबतीत निर्माण झाला.

ज्या दिवशी डॉक्टर डिसुझा गायब झाला त्याच्या दुसऱ्या दिवशीच हेर खात्याच्या एका अधिकाऱ्याच्या घरातील कपाट कुणीतरी उघडलेले असावे असे त्या अधिकाऱ्याला वाटले. तो दोन दिवस घरात नसल्यामुळे कुणीतरी प्रवेश केला असावा अशी शंका त्याला आली. आणि जेव्हा कपाटाचा चोर खणदेखील उघडण्यात आल्याचे त्याने पाहिले तेव्हा सरसरीत काटा त्याच्या अंगावर उभा राहिला.

अत्यंत महत्त्वाचे असे गुप्त कागदपत्र असलेला लखोटा गायब झालेला होता. धावत पळत तो आपल्या वरिष्ठाकडे आला. आपले काय होईल याची पर्वा न करता त्याने जे काही घडले ते सांगून टाकले. त्या अधिकाऱ्याची चौकशी करण्याच्या भरीला न पडता डॉक्टर डिसुझाच्या शोधासाठी धावपळ सुरू झाली. भारतातील कमांडोज पध्दतीचे चिनी एजंट सावध बनले. जवळजवळ वीस दिवस डॉक्टरांचा थांगपत्ता कुणालाही लागला नाही.